# 'ऑक्स २५ आर्चर्ड एस. डीलक्स' ट्रॅक्टरचे अनावरण

**पुणे :** 'फोर्स मोटर्स लि.' च्या नवीन 'ऑक्स २५ आर्चर्ड एस. डीलक्स' ट्रॅक्टरचे शनिवारी (ता. २४) प्रदर्शनामध्ये अनावरण करण्यात आले. 'सकाळ पेपर्स प्रा. लि.'चे अध्यक्ष प्रतापराव पवार, फोर्स मोटर्सचे माजी संचालक रॉल्फ बाकर, फोर्स मोटर्सचे विपणन व विक्री अधिकारी प्रदीप धाडिवाल, 'अॅग्रोवन'चे संपादक आदिनाथ चव्हाण, अॅग्रोवनचे उपसरव्यवस्थापक प्रमोद राजेभोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत ट्रॅक्टरचे अनावरण करण्यात आले.

**ट्रॅक्टरची वैशिष्ट्ये :**

ट्रॅक्टरची रुंदी दीड मीटर असून, ऊस, डाळिंब, द्राक्ष आदींसह सर्व प्रकारच्या आंतरमशागतीसाठी हा ट्रॅक्टर उपयुक्त आहे. २७ एच.पी. मर्सिडीज ३ सिलिंडर डिराइव्ड इंजिन आहे. ओव्हरहेड कॅम शाफ्ट, पॉवर स्टेअरिंग, ड्युअल क्लच, मल्टिस्पीड पी.टी.ओ, ५०० व १००० स्पीड, ए.डी.डी.सी. बॉश कंपनीचे हायड्रोलिक आहे. त्याची उचलण्याची क्षमता १००० किलो आहे. एकूण १२ गिअर स्पीड असलेल्या या ट्रॅक्टरमध्ये रिव्हर्स गिअरमध्ये ४ स्पीड आहेत. ऑइलमध्ये बुडालेले मल्टी डिस्क ब्रेक, प्लॅनिटी ड्राइव्ह, यांसारख्या सुविधा आहेत. मागील टायरचा आकार ९.५ x २४, तर पुढील टायर ५ x १५ व्यासाचा आहे. इंजिन व गिअर बॉक्सची दोन वर्षे वॉरंटी असून, हायड्रोलिकची ३ वर्षे वॉरंटी आहे.




**'सकाळ पेपर्स प्रा. लि.'चे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्या हस्ते 'ऑक्स २५ आर्चर्ड एस. डीलक्स' या नव्या ट्रॅक्टरचे अनावरण करण्यात आले. या वेळी फोर्स मोटर्सचे रॉल्फ बाकर, प्रदीप धाडिवाल उपस्थित होते.**